# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १२.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ चे ००.२६ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे हद्दीत विटाभटटी चौकात एक इसम पोलीसांना पाहून पळाला असता, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव इरफान अमजद खान वय १९ वर्षे रा. पवन नगर, शिवाजी चौक, गली क्र. १, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण २७.८२ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल असा एकुण १,४७,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी रेहान नईम सय्यद वय अंदाजे २१ वर्ष रा. इंदीरामाता नगर, यशोधरानगर, नागपूर याची एम.डी. पावडर असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम. डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२१(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, सपोनि. दीलीप पाटील, पोउपनि. अशोक हाटकर, पोहवा राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, मनिष झरकर, क्षितेश चौरसिया, भुषण येरोजवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, राणा प्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, कामगार कॉलनी, सुभाषनगर, प्रज्ञाशिल बुध्द विहारजवळ एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोशन ज्ञानेश्वर कोडापे वय २८ वर्षे रा. गली क्र. ५, शिवमंदीरजवळ, संत तुकडोजी नगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत

कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा दिनेश भोगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे पोउपनि. प्रशांत खोत यांनी आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ चे १४.१० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पिपळा मोक्ष घाटजवळ एक गुलाबी टिशर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पियुष उर्फ **चिरी** विकास मांडवगडे वय २० वर्षे रा. आलागोंडी, बुटीबोरी, जि. नागपूर ह.मु. उदयनगर गार्डनमागे, आटा चक्कीजवळ, निमजेचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे मानकापूर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०७.२०२६ चे २२.३० वा. ते दिनांक १२.०७.२०२६ चे ०२.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत प्लॉट क्र. १७, दिव्य ले आऊट, म्हॉडा कॉलनी, गोधनी रेल्वे, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती मोनाली चेतन बारापात्रे वय ३४ वर्ष हया त्यांचे परिवारासह घरात झोपलेल्या असतांना,, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे बाजुचे खिडकीतुन हात टाकुन, दाराची कडी उघडुन आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,८५,७५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. रोहन पाटील ७७२१८१५१३० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** दिनांक १२.०७.२०२६ चे ११.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, बख्त बुलंदशाह पुतळयाचे बाजुस, मिठा निम दर्गाहजवळ, फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, बांधा—सडपातळ, डोक्याचे केस—काळे व वाढलेले, दाढी—वाढलेली, अंगात— कत्था रंगाची हॉफ पॅन्ट घातलेली असून दोन्ही पाय बारीक आहेत. अपंग दिसत असून सोबत वॉकर मिळून आले आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी नंदलाल गोपीचंद आनंदानी वय ६० वर्ष रा. शहीद हेमू कॉलनी चौक, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे धंतोली:—** श्रीमती कौसल श्रीधर वासनिक वय ६३ वर्षे, रा. वार्ड क्र. ५, बुध्द विहार, मंगरुळ दस्तगीर बस स्टॅन्डजवळ, ता. धामणगाव जि. अमरावती हया दिनांक १०.०७.२०२६ चे १०.२० वा. चे सुमारास पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील कृपलानी चौक, मेट्रो स्टेशन जवळून वर्धा—यवतमाळ बसने राहते घरी जाण्याकरीता निघाल्या होत्या. अद्याप घरी परत पोहोचल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. **वर्णन** —रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट ५ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— पिवळया व नारंगी रंगाची साडी व निळे ब्लाऊज घातलेले आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—मानसिक आजारी आहेत.



कौसल

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**